# रोटरी संसदेत संमत घटनादुरूस्त्या

रोटरीची संसद (कौन्सिल ऑन लेजिस्लेशन) शिकागोमध्ये एप्रिल २०१६ मध्ये भरली होती. त्यांत संमत झालेल्या काही घटनादुरूस्त्या खालीलप्रमाणे आहेत. त्यांचा परिणाम रो.इं. व रोटरी क्लब घटना व नियमावली व रोटरी फाऊंडेशनच्या कारभार/कार्यक्रमावर पडू शकतो. या दुरूस्त्या क्लबांकडे संमतीसाठी पाठवल्या जातील व तिथून हिरवा दिवा मिळाल्यावर १ जुलै २०१६ पासून अंमलात येतील.

### क्लबसंबंधी

१) १६.०१ रोटरी क्लबच्या संचालक मंडळाची (बोर्डाची) बैठक झाल्यापासून ६० दिवसात त्या बैठकीचा वृत्तांत क्लबच्या सर्व सदस्यांना प्राप्त करून द्यायला हवा.

२) १६.०२ क्लबचा खजिनदार (ट्रेझरर) हा संचालक मंडळाचा सदस्य असायलाच हवा.

३) १६.०५ छोटया क्लबांसाठी खालील किमान पांचच समित्या अनिवार्य असतील.

क्लब व्यवस्थापन (ॲडमिनिस्ट्रेशन), सदस्यता (मेम्बरशिप), जनसंपर्क (पब्लिक रिलेशन्स), रोटरी फाऊंडेशन, सेवाभावी प्रकल्प (सर्व्हिस प्रोजेक्टस्) गरजेनुसार अधिक समित्या स्थापन करता येऊ शकतील.

४) १६.०६ रोटरी क्लबचे उद्दिष्टे

रोटरीच्या उद्दिष्टपूर्तीचा पाठपुरावा करणे, ५ सेवाविभागात यशस्वी प्रकल्प कार्यवाही करणे, रोटरीच्या वृद्धीसाठी सदस्यतावृद्धी, रोटरी फाऊंडेशनला पाठिंबा व क्लबबाहेरही रोटरीत काम करू शकतील अशा नेतृत्वाचा विकास करणे.

५) १६.०७ रोटरी क्लबमध्ये प्रवेश / पुनर्प्रवेश देताना प्रवेश फी (ॲडमिशन फी) घेता येणार नाही.

### सेवाविभाग

६) १६.१० रोटरीचा दुसरा सेवा विभाग - व्यवस्थापन सेवा (व्होकेशनल सर्व्हिस) मध्ये यांत भर टाकली. "रोटेरियन्सनी त्यांच्या व्यवसायातील कसब आपल्या क्लबच्या सेवाभावी प्रकल्पांना द्यावे जेणेकरून समाजाच्या निकडीच्या गरजांची पूर्तता होईल."

७) १६.२१ क्लबना त्यांची बैठक किती वेळा घ्यायची हे ठरवता येईल, उपस्थितीचे नियम ठरवता येतील, गैरहजेरीच्या नियमात बदल करता येतील, यांत रोटरी बैठकांसाठी उत्तम वेळ व ठिकाण ठरवणे, गरजेनुसार बैठक रद्द करणे, बैठकीच्या स्वरूपात गरजेनुसार बदल करणे जसे, प्रत्यक्ष बैठक, ई बैठक, सामूहिक बैठक वगैरे.

८) १६.२६ जर एखादी सार्वजनिक सुट्टी ज्या आठवडयात क्लबची बैठक असेल त्या आठवडयातच आली तर क्लबला त्या आठवडयाची बैठक रद्द करता येईल.

९) १६.३० सदस्यांना "ऑनलाइन" (जर व्हिडीओ कॉन्फरन्सची सोय असेल तर) वा प्रत्यक्ष हजर राहून क्लबच्या बैठकीला उपस्थिती लावता येईल.

१०) १६.३४ सदस्याला मूल झाले तर त्या वर्षी त्याला क्लब बैठकांना अनुपस्थित राहण्याची अनुमति देता येईल.

११) १६.३५ जर सदस्याचे वय ६५ असेल व त्याला रोटरीत २० एका वा एकाहून अधिक क्लबमध्ये मिळून झाली असतील तर अशांना क्लबच्या बैठकांच्या उपस्थितीच्या नियमातून सूट मिळेल.

१२) १६.३६ वर्गवारीसंबंधीच्या (क्लासिफिकेशनच्या) नियमाबाबत क्लब निर्णय घेऊ शकतील ज्यांत सक्रिय (ॲक्टिव्ह) वा मानद (ऑनररी) खेरीज अन्य प्रकारचा सदस्य करणे, पूर्वीचे रोटेरियन्स व बदलीमुळे गांवात आलेल्या सदस्यांना कसे सामावून घ्यायचे ते ठरवता येईल, एकाहून अधिक क्लबमध्ये सदस्य होणे, रोटरॅक्ट मध्ये असूनही रोटेरियन होणे, मानद सदस्यांचा कसा उपयोग करून घ्यायचा हे ठरवणे वगैरे येईल.

१३) १६.३८ उत्तम चारित्र्य, बांधिलकी व नेतृत्वगुण असणा-या नागरिकांना (वर्गवारी नसली तरी) सदस्य म्हणून घेता येईल.

१४) १६.४० रोटरॅक्टर्सना रोटरी क्लबचेही सदस्यत्व घेता येईल.

१५) १६.४७ मानद सदस्यांसंबंधी तरतूद - पर्मनंट सपोर्ट ऐवजी "सपोर्ट" - रोटरीच्या कार्यास.

१६) १६.४८, ४९, ५० सदस्यांच्या निलंबनाबाबतच्या तरतुदीत बदल करण्यात आले आहेत.

१७) १६.५१ जर एखादा सदस्य पहिला क्लब सोडून दुस-या क्लबमध्ये जात असेल तर त्याने पहिल्या क्लबकडून "काही देणे नाही" याबाबतचे पत्र घ्यायला हवे. पण तसे पत्र ३० दिवसात मिळाले नाही तर काही देणे नाही असे समजले जाईल.

## रो.इं.चे अधिकारी व निवडणुका

१८) १६.५४ रो.इं.च्या अध्यक्षांना रो.इं.च्या संचालक मंडळाच्या प्रस्थापित अधिकारी खेरीज अन्य काहीही अधिकार नाहीत.

१९) १६.५५ रो.इं.चे नियोजित अध्यक्ष (प्रेसिडेंट नॉमिनी) रो.इं.च्या संचालक मंडळाचे मतदानाचे अधिकार नसलेले सदस्य असतील.

२०) १६.५७ रो.इं.च्या माजी संचालकांना रो.इं.च्या अध्यक्षांच्या निवड समितीवर केवळ तीन वेळाच काम करता येईल.

२१) १६.६१, ६२, ६३ रो.इं.च्या संचालकाच्या निवड समितीत निवड होणा-या उमेदवाराला किमान ६०% मते मिळणे अनिवार्य आहे. व अन्य काही तरतुदीत बदल.

२२) १६.७१ डिस्ट्रिक्ट गव्हर्नरांच्या निवडणुकीत आव्हान द्यायचे असेल (चॅलेंजिंग) तर अशा उमेदवाराला किमान १० रोटरी क्लबांचा किंवा डिस्ट्रिक्टमधील २०% क्लबांचा पाठिंबा असणे आवश्यक आहे.

२३) १६.७२ जर डिस्ट्रिक्ट गव्हर्नर निवडीसाठी नॉमिनेशन कमिटीचा निर्णय काही कारणाने होऊ शकला नाही व क्लबांकडून पहिल्या कमिटीपुढे उमेदवारीचे काही प्रस्ताव आले नसतील तर पुनः नॉमिनेशन कमिटी करण्याची आवश्यकता असणार नाही.

२४) १६.७४ डि.जी.नॉमिनेशन कमिटी पुढील वर्षासाठीच्या व्हाइस गव्हर्नरची निवड करेल.

२५) १६.७६ डि.जी.नॉमिनेशन कमिटी डीजीईने निर्देशित केलेल्या पीडीजी ची व्हाइस गव्हर्नर म्हणून निवड करेल.

२६) १६.७७ जर व्हाइस गव्हर्नर पदासाठी कोणाचेही नॉमिनेशन आले नाही तर डीजीई व्हाइस गवहर्नरची निवड करेल.

२७) १६.७९ कौन्सिल ऑन लेजिस्लेशन व रो.इं. डायरेक्टर नॉमिनेशन कमिटी सदस्यांच्या निवडीसंबंधी बदल.

२८) १६.८१ रो.इं.च्या संचालक मंडळाला एखादा रोटरी क्लब न्यायालयीन प्रक्रियेत गेला वा एखाद्या रोटरी डिस्ट्रिक्टकडून वारंवार निवडणुकीसंबंधी तक्रारी आल्या तर अशा क्लबा वा डिस्ट्रिक्टला निलंबित / रद्द करण्याचे अधिकार असतील.

२९) १६.८२ नेहमीचे रोटरी क्लब व ई क्लब यामध्ये काहीही भेदभाव राहणार नाहीत. (ई क्लबांना त्यांच्या नांवातील ई हे संबोधन गाळता येईल.)

३०) १६.८३ नवीन रोटरी क्लब काढताना किमान २० चार्टर मेम्बर्स असणे आवश्यक असेल.

३१) १६.८४ रो.इं.संचालक मंडळाला १०० पेक्षा जास्त रोटरी क्लब वा ११०० पेक्षा कमी रोटेरियन्स असलेल्या रोटरी डिस्ट्रिक्टच्या हद्दी बदलण्याचे वा त्यांना अन्य डिस्ट्रिक्टमध्ये विलीन करण्याचे वा त्यांचे विभाजन करण्याचे अधिकार असतील.

३२) १६.८६ रोटरी डिस्ट्रिक्टच्या हद्दी बदलणे, त्यांचे विलीनीकरण वा विभाजन यासंबंधीची कार्यवाही संचालक मंडळाच्या निर्णयानंतर दोन वर्षांनी प्रत्यक्षात येईल.

३३) १६.८८ गतवर्षीचे हिशोब काही कारणाने डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्समध्ये संमत होऊ शकले नाहीत तर पुढील ३ महिन्यात - ३० दिवसाच्या पूर्वसूचनेने - क्लब प्रतिनिधींची बैठक घेऊन डिस्ट्रिक्ट बैठकीत संमत करून घेता येईल. क्लबांना त्यासाठी अधिकृत प्रतिनिधी पाठवता येईल.

३४) १६.८९ डिस्ट्रिक्टच्या वा क्लबांच्या आर्थिक गैरव्यवहारासंबंधी जबाबदार ठरलेल्या कोणाही रोटेरियनला डिस्ट्रिक्ट पद धारण करता येणार नाही.

३५) १६.९० रो.इं.ची सदस्यत्व समिती (मेम्बरशिप कमिटी) असेल.

३६) १६.९१ रो.इं.च्या ऑडिट कमिटीची पुनर्रचना करण्यात येईल.

३७) १६.९३ रो.इं.च्या स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग कमिटीची पुनर्रचना करण्यात येईल.

३८) १६.९६ एकाच घरात राहणा-या दोन वा अधिक रोटेरियन्स एकाच अधिकृत रोटरी मासिकाची वर्गणी सामाईकरीत्या भरता येईल तसेच रो.इं.चे संचालक मंडळ परिस्थितीनुसार काही क्लब वा डिस्ट्रिक्टचे मासिक घेण्यापासून सवलत घेऊ शकेल.

३९) १६.९९ २०१७-१८, १८-१९ व १९-२० या तीन वर्षी प्रतिवर्ष ४ डॉलर्स प्रमाणे रो.इं.ची वर्गणी वाढेल.

४०) १६.१०५ रो.इं.कडून निलंबनाची कार्यवाही न होण्यासाठी वेळेमध्ये रो.इं.ची देय वर्गणी वेळेवर देण्याचे क्लबांवर बंधनकारक राहील.

४१) १६.१०६ रो.इं.च्या घटनादुरूस्त्या संबंधीचे प्रस्तावाची एक प्रत प्रत्येक डिस्ट्रिक्टला पाठवली जाईल व जे क्लब स्वतंत्र प्रतिची मागणी करतील त्यांना ती पुरवली जाईल. (पूर्वी डिस्ट्रिक्टला १० प्रती पाठवल्या जायच्या.)

४२) १६.११३/११४ यापुढे रोटरी कौन्सिल ऑन रिझॉल्यूशन (रो.इं.संचालक मंडळासाठी विचारार्थ ठराव) असेल. त्यांचे सदस्य तीन वर्षासाठी असतील व दरवर्षी येणा-या रिझॉल्यूशनवर ई व्होटींग घेतले जाईल. कौन्सिल ऑन लेजिस्लेशनमध्ये फक्त घटनादुरूस्तीवर विचार होईल.

## रो.इं.संचालक मंडळाच्या विचारार्थ संमत ठराव

१) १६.११८ पोलिओ निर्मूलन ही रो.इं.ची सर्वोच्च उद्दिष्ट आहे याचा पुनरूच्चार करावा.

२) १६.१२६ लैंगिक गैरव्यवहाराविरूद्धच्या मोहिमेस रो.इं.ने पाठिंबा द्यावा.

३) १६.१३२ इंटरॅक्टच्या वयोमर्यादेसंबंधी पुनर्विचार व्हावा.

४) १६.१३६ रोटरी कार्डस्चा प्रसार / प्रचार करावा.

५) १६.१३८ "सेवेच्यासंधी" संबंधीच्या तरतुदीत कुटुंब (फॅमिली) चा समावेश व्हावा.

६) १६.१३९ रोटरी फाऊंडेशनच्या शताब्दि वर्षाची नोंद घ्यावी.

७) १६.१४१ शस्त्रक्रियेपूर्वीच्या रो.फा.ट्रस्टींनी नंतरच्या काळजीसंबंधीच्या उपकरणांचा रोटरी फाऊंडेशन अनुदानात समावेश करावा.

८) १६.१४२ रो.फा.ट्रस्टींनी डिस्ट्रिक्ट ग्रँटस् सबकमिटीच्या अध्यक्षांना ग्रँटस्संबंधीच्या अर्जाची पाहणी व पाठपुरावा करण्याची परवानगी असावी.

९) १६.१४४ रो.फा.ट्रस्टींनी "एरिआज ऑफ फोकस" खेरीज अन्य क्षेत्रातही रो.फा. शिष्यवृत्त्या देण्याची तरतूद करावी.

१०) १६.१४९ डिस्ट्रिक्ट सेक्रेटरीची भूमिका व जबाबदारी यांची नोंद रो.इं. संचालक मंडळाने घ्यावी.

११) १६.१५१ रोटरी क्लबांना त्यांच्या स्वायत्ततेची जाणीव रो.इं.संचालक मंडळाने करून द्यावी.

१२) १६.१५७ सर्व डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्सना रो.इं.च्या अध्यक्षांच्या संदेशाचे प्रसारण व्हिडिओ कॉन्फरसिंग द्वारा करण्याची व्यवस्था करावी.

१३) १६.१६० रो.इं.च्या कार्पोरेट गव्हर्नन्स स्ट्रक्चरची पुनर्रचना करण्यासंबंधी पुढच्या कौन्सिलमध्ये प्रस्ताव सादर करावा.

१४) १६.१७२ जेव्हां रो.इं.चे साहित्य मोफत उपलब्ध असेल तेव्हां ते व्यापारी व लायसेन्सीद्वारा उपलब्ध होऊ देऊ नये.

---

सूचना - वरील भाषान्तर हे प्राथमिक माहिती सहज मिळावी म्हणून केले आहे. यातील विधानाबाबत काही शंका/दुरूस्त्या वाटल्यास मूळ इंग्रजीतील मजकूर जो रो.इं.च्या वेबसाइटवर आहे तो पहावा. प्रस्तुत भाषांतरकार त्याबाबतची जबाबदारी घेऊ शकत नाही.

- रो.पीडीजी डॉ. सुधीर राशिंगकर
रो.इं.डि.३१३१
9822022014
sudhirr@vsnl.com